


# फ्लिपकार्ट आणि मिंत्राचे शाश्वततेच्या संदर्भातील प्रयत्न वृद्धिंगत करून वनसंवर्धन करण्यासाठी कॅनॉपीशी सहकार्य

- कॅनॉपीच्या पॅक4गुड (पॅकेजिंगसाठी) आणि कॅनॉपीस्टाईल (फॅशनसाठी) या उपक्रमांमध्ये सहभाग
- आपल्या पॅकेजिंग, पेपर किंवा मानवनिर्मित सेल्युलॉसिक फायबर्समध्ये प्राचीन आणि अस्तंगत होण्याचा धोका असलेल्या वनांमधून मिळवल्या जाणाऱ्या घटकांचा वापर बंद करण्याचा दृष्टिकोन आणि प्रणालीला साह्य

**बंगळुरु आणि व्हॅंकूव्हर - २२ जुलै २०२१** : फ्लिपकार्ट ही भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठ आणि मिंत्रा ही भारतातील एका आघाडीची फॅशन आणि लाईफस्टाईल डेस्टिनेशन यांचा समावेश असलेल्या फ्लिपकार्ट ग्रूप या भारतातील एतद्देशीय कन्झ्युमर इंटरनेट परिसंस्थेने शाश्वत पॅकेजिंग आणि मानव निर्मित सेल्युलॉसिक फायबर्सचा जबाबदारीने वापर करण्याची बांधिलकी जाहीर केली आहे. यासाठी कॅनॉपी या ना-नफा तत्वावरील पर्यावरणासाठी झटणाऱ्या संस्थेशी भागीदारी करण्यात आली आहे.

हवामान सुयोग्य राखणे, जैवविविधता जोपासणे आणि मूळ समुदायांचे हक्क संरक्षित ठेवणे यासाठी जगातील वने किती महत्त्वाची आहेत याची जाणीव फ्लिपकार्ट आणि मिंत्राला आहे. शाश्वत पॅकेजिंग आणि मटेरिअल सोर्सिंगच्या दिशेने आपली शाश्वतेसंदर्भातील बांधिलकी वृद्धिंगत करण्यासाठी या कंपन्यांनी कॅनॉपीच्या पॅक4गुड आणि कॅनॉपीस्टाईल या उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. पर्यावरणस्नेही पेपर श्रेड्स, पॉली पाऊचऐवजी पुनर्वापरातील पेपर बॅग्स, बबल रॅप्सऐवजी कार्टन वेस्ट श्रेडेड मटेरिअल आणि 2 प्लाय रोल वापरणे अशा विविध पर्यायांतून अत्यंत स्केलेबल असे शाश्वत पर्याय आपल्या पॅकेजिंगमध्ये समाविष्ट करून सिंगल-युझ प्लास्टिकचा वापर कमी करण्याचे प्रयत्न करत असल्याची घोषणा त्यांनी नुकतीच केली आहे.

कॅनॉपीच्या पॅक4गुड आणि कॅनॉपीस्टाईल या उपक्रमांमधील अधिकृत सहभागी म्हणून फ्लिपकार्ट ग्रूपमधील दोन कंपन्या जंगलांतून मिळणाऱ्या उत्पादनांच्या अधिक शाश्वत स्रोतांकडे वळतील आणि कच्च्या मालासाठी वनांऐवजी

इतर नेक्स्ट जनरेशन पर्यायांचा वापर करतील. ही बांधिलकी जपण्यासाठी फ्लिपकार्ट आणि मिंत्रा पुढील तीन वर्षांत खालील उपक्रमांवर भर देतील :

- घडीचा कागद आणि पेपरबोर्डचा वापर कमी करण्यासाठी पुन्हा वापरता येण्याजोगे/भरता येण्याजोगे शिपिंग बॉक्सेस मिळवणे किंवा डिझाइन करण्याचे प्रयत्न
- पुनर्वापर केलेले, पुन्हा वापरता येण्याजोगे आणि/किंवा एफएससी प्रमाणित कागद आणि पॅकेजिंग वापरास प्रोत्साहन तसेच जबाबदारीपूर्ण स्रोतांतील मानवनिर्मित सेल्युलोसिक फायबर्सची उत्पादने मिळवणे
- ई-कॉमर्स, शिपिंग, डिस्प्ले आणि रॅपिंग सिस्टमची डिझाइन आणि अवलंब अशा पद्धतीने करणे ज्यामुळे पॅकेजिंग मटेरिअल्सचा वापर कमीतकमी केला जाईल
- पॅकेजिंगमध्ये पुनर्वापरातून बनवलेल्या मटेरिअल्सचा वाढता वापर
- इंट्रा बिझनेस कार्यचलनात पुनर्वापरयोग्य पॅकेजिंग प्रणालीचा वापर
- डिजिटल कम्युनिकेशन, मार्केटिंग आणि अकाऊंटिंग प्रणालीचा अधिक वापर
- उदयोन्मुख आणि सर्क्युलर अर्थव्यवस्था नाविन्यतांचा अवलंब आणि त्यासंदर्भातील संशोधनासह विविध सुयोग्य प्रणालींचा अवलंब
- रेयॉन/व्हिसकोज, लियोसेल आणि मोडल यासारख्या जबाबदार पद्धतीने तयार करण्यात आलेल्या मानवनिर्मित सेल्युलोसिक फायबर्सचा इन-हाऊस उत्पादनांमध्ये वाढता वापर

"नेक्स्ट जेन पॅकेजिंग आणि कपड्यांच्या उत्पादनात जागतिक नेतृत्व करण्याची अतुलनीय क्षमता भारतात आहे आणि फ्लिपकार्ट आणि मिंत्रासोबतच्या या भागीदारीमुळे या पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांना अर्थपूर्ण कालावधीत वेग मिळेल," असे **कॅनॉपीचे कार्यकारी संचालक निकोल रेक्रॉफ्ट** म्हणाले. "फ्लिपकार्ट ग्रूपच्या नेतृत्वाचे आम्हाला कौतुक वाटते आणि ही महत्त्वाकांक्षी लक्ष्ये गाठण्यासाठी त्यांच्यासोबत काम करण्यास आम्ही उत्सुक आहोत."

**फ्लिपकार्टच्या सप्लाय चेनचे प्रमुख आणि वरिष्ठ उपाध्यक्ष हेमंत बद्री** म्हणाले, "फ्लिपकार्टमध्ये एक एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठ म्हणून आम्ही जबाबदार पद्धतीने सोर्सिंग करणे आणि व्यावसायिक गरजांसाठी शाश्वत पर्याय निर्माण करणे यातून शाश्वत पर्यावरण निर्माण करण्यास बांधिल आहोत. या प्रयत्नांमध्ये कॅनॉपीस्टाईल आणि पॅक4गुड या दोन्ही उपक्रमांमध्ये सहभागी होताना आम्हाला आनंद होत आहे. यातून जगातील प्राचीन आणि अस्तंगत होत चाललेली वने वाचवली जातील. पॅकेजिंगसाठी नवे सोर्सिंग पर्याय खुले करणाऱ्या आणि त्यासोबतच इतर महत्त्वाच्या कार्यचलनात बदलांना चालना देणाऱ्या, लॉजिस्टिक, इन्फ्रास्ट्रक्चर, ऊर्जेचा योग्य वापर आणि अशा इतर शाश्वत उपक्रमांसाठी या सखोल भागीदारीबद्दल आम्ही उत्सुक आहोत."
**मिंत्राच्या उपाध्यक्ष आणि सोर्सिंग विभागाच्या प्रमुख नीतू जोटवानी** म्हणाल्या, "मिंत्रा शाश्वततेला बांधिल आहे आणि संपूर्ण पुरवठा साखळीत पुनर्वापरला प्राधान्य देत तसेच उत्पादन प्रक्रिया अधिक पर्यावरणस्नेही करण्यासाठी प्रयत्न करत कार्बन उत्सर्जन कमी करण्यात या क्षेत्रातील अनेक पहिले उपक्रम सुरू करण्यात आम्ही नेहमीच आघाडीवर राहिलो आहोत. कॅनॉपीसोबतचे हे सहकार्य आणि फॅशनसाठी कॅनॉपीस्टाईल आणि पॅकेजिंगसाठी

पॅक4गुडचा अवलंब करणे हे सिंगल युझ प्लास्टिक हद्दपार करणे आणि पर्यावरणस्नेही पद्धतींना चालना देण्याच्या दृष्टीने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे."

जबाबदार वनीकरण आणि जगातील प्राचीन आणि अस्तंगत होत चाललेल्या वनांतून कोणत्याही प्रकारचे सोर्सिंग होणार नाही याची खातरजमा करणे हे शाश्वततेच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे आणि हे धोरण फ्लिपकार्ट ग्रूपच्या धोरणाला यशस्वी बनवण्यात महत्त्वाचे ठरेल. कॅनॉपीच्या साहयाने पुरवठा साखळी आता जीवरक्षक मूल्यसाखळीत बदलेल.

फ्लिपकार्टचे फॉरेस्ट सोर्सिंग धोरण वाचा.

**Media Contacts:**

**Canopy Contact**
Mike Hudema
+1 778-989-6153
communications@canopyplanet.org

**Flipkart Contact**
Media@flipkart.com

**About Canopy**

Canopy is a not-for-profit environmental organization dedicated to protecting forests, species, and climate. Canopy has collaborated with more than 750 companies to develop cutting-edge environmental policies that transform unsustainable supply chains, spark innovative solutions, and protect our world's remaining Ancient and Endangered Forests. Learn more at: www.canopyplanet.org

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, Flipkart Wholesale, and Cleartrip. The Group is also a majority shareholder in PhonePe, one of the leading Payments Apps in India.

Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's digital commerce revolution, with a registered customer base of more than 350 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem, and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with its group companies, Flipkart is committed to transforming commerce in India through technology.